| | | |
|---|---|---|
| | रावेर पोलीस स्टेशन<br>फोन नंबर ०२५८४-२५०३३३<br>**Email Id** :- raverpi2@gmail.com | |
| रावेर पोलीस स्टेशन | जावक क्रमांक - /२०२६ | दिनांक :- २०/०८/२०२६ |

# प्रेस नोट

**मा.संपादक सो.**

------------

## रावेर पोलिस स्टेशन गुन्हे शोध पथकाने गावठी कटटा व ०२ काडतुस सह एका इसमांस केली अटक.

आम्हास आज रोजी गुप्तबातमीदारव्दारे माहीती मिळाली की रावेर बस स्टॅड च्या मागे छोरीया मार्केट जवळ एक इसम हा त्याचे जवळ शस्त्र बाळगुण संशयीतरीत्या फिरत आहे.

वरील प्राप्त माहीती ची खातरजमा करण्याकरीता दि. २०/०८/२०२६ चे दुपारी गुन्हे शोध पथक हे रावेर शहरातील बसस्टॅड च्या मागे परीसरात गेले असता तेथे छोरीया मार्केट कडे जाणाऱ्या रस्तावर एक इसम अंगात राखाडी रंगाची फुल बाहयांचा शर्ट व निळया रंगाची जिन्स पॅट घातलेला अंदाजे २५ वर्ष वय असलेला इसम पथकाच्या नजरेस पडला पोलीस पथकाला पाहुन त्याच्या हालचाली हया संशयास्पद वाटल्याने पथकाने त्याला थांबवुन त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याचे जवुळुन २५,०००/- रुपये किमतीचा लोंखंडी धातुचा तपकीरी रंगाचा देशी बनावटीचा कटटा (अग्नीशस्त्र)कंबरेला खोचलेले आढळुन आले. तसेच त्याच्या अंगझडतीत १०००/- रुपये किमतीचे दोन जिवंत काडतुस मिळाले आहे.

सदर संशयीतास त्याचे नांव गांव विचारले असता त्याने त्याचे नांव कृष्णा दत्तु पाटील वय- २० रा रोकडा हनुमान मंदीर नगर रावेर असे सांगीतले सदर संशयीतावर रावरे पोलिस स्टेशन येथे पो.कॉ/ सुकेश तडवी यांनी सरकारतर्फ फिर्यादी होवुन गुरंन- ३९८/२०२६ भारतीय हत्यार कायदा कलम ३ सह २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपीताकडे सदर शस्त्रा बाबत सखोल तपास चालु असुन त्याच्या सोबत अजुन कोणी साथीदार आहे किवा नाही व संशयीताने तो कोठुन खरेदी केला ? कोणत्या कारणांकरीता खरेदी केला ? या बाबत पुढील तपास चालु आहे.

सदर कार्यवाही ही मा. श्रीकांत धिवरे सो पोलिस अधिक्षक जळगांव , मा. श्री संदीप गावीत सो अपर पो. अधिक्षक जळगांव परीमंडळ, तसेच मा.श्री अनिल बडगुजर पोलिस उपअधिक्षक फैजपुर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली रावेर पोलिस स्टेशन चे पो.नि.संदीप पाटील, सपोनी हरीदास बोचरे तसेच गुन्हे शोध पथकातील पो.हे.कॉ समाधान ठाकुर, पो.कॉ. सुकेश तडवी, श्रीकांत चव्हाण , विकार शेख , प्रमोद पाटील, विशाल पाटील, संभाजी बिजागरे यांनी केली आहे.

s/d

(संदीप पाटील )
पोलिस निरीक्षक
रावेर पोलिस स्टेशन


महाराष्ट्र पोलीस
रावेर पोलीस स्टेशन